गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३३३ वा ● मंगळवार २३ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 333 | Date : 23/04/2024 blow Tuesday Page 4 Price 4


## सोलापुरात २१ तर माढ्यात ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर लोकसभा मतदारसंघात ३२ पैकी ९ उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे २१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. तर माढा मतदारसंघात ६ उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे ३२ उमेदवारांमध्ये अंतिम लढत होणार आहे. उमेदवारी माघार घेतलेल्यांमध्ये सोलापुरातील वंचित बहुजन आघाडीचे राहुल गायकवाड तर माढ्यात शेकापचे बंडखोर ड. सचिन देशमुख यांचा प्रामुख्याने समावेश आहे. सोलापुरात भाजपचे राम सातपुते आणि काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांच्यासह बहुजन समाज पार्टीचे बबलू गायकवाड यांची लढत होणार असून गायकवाड यांनी वंचित बहुजन आघाडीचा पाठिंबा मागितला आहे. भाजपच्या विरोधात बंडखोरी करून यशवंत सेनेतर्फे उभे राहिलेले संजय क्षीरसागर यांच्यासह अन्य बहुसंख्य उमेदवार अपक्ष आहेत. प्रमुख लढत काँग्रेस आणि भाजपमध्ये होणार असल्याचे चित्र दिसत असले तरी बसपाला वंचित बहुजन आघाडीचे समर्थन मिळाल्यास तिरंगी लढत होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. याबाबत वंचित बहुजन आघाडीची भूमिका स्पष्ट झाली नाही.

माढा लोकसभा मतदारसंघात भाजपचे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे धैर्यशील मोहिते-पाटील या दोन्ही तुल्यबळ उमेदवारांसह वंचित बहुजन आघाडीचे रमेश बारसकर, शिवसेना उध्दव ठाकरे गटाविरूध्दचे बंडखोर प्रा. लक्ष्मण हाके आदी ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिल्यामुळे मतदानासाठी प्रत्येक मतदान केंद्रात तीन मतदान यंत्रांची व्यवस्था करावी लागणार आहे. माढा मतदारसंघात एकूण १९ लाख ९६ हजार १०० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यात १० लाख ३२ हजार ६७० पुरूष तर ९ लाख ५५ हजार ७०६ आणि इतर ७० यांचा । पान २ वर

## वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार राहुल गायकवाड यांची माघार



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा मतदारसंघात ऐनवेळी मोठा ट्विस्ट आला आहे. येथे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार राहुल गायकवाड यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आजचा (२२ एप्रिल) शेवटचा दिवस आहे. वंचित बहुजन आघाडीचे ते अधिकृत उमेदवार आहेत. मात्र स्थानिक कार्यकारणी मदत करणार नाही हे लक्षात आल्याने त्यांनी या निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे आता सोलापुरातील निवडणुकीचे गणित बदलणार आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर गायकवाड यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. मला युद्धाच्या मैदानात उतरवण्यात आलं. बंदुकही देण्यात आली. पण त्या बंदुकीत गोळ्याच नाहीत, अशी खदखद गायकवाड यांनी व्यक्त केली. माझी उमेदवारी जाहीर झाल्यापासून गेल्या पंधरा दिवसांपासून मी सोलापूर जिल्ह्यात आलो. इथे आल्यानंतर माझी सोलापूरच्या कार्यकारिणीशी भेट झाली. सोलापूरच्या । पान २ वर

## गतवर्षांतील घटनांमुळे जागतिक तापमानवाढीला दुजोरा

नवी दिल्ली : जगभरातील विविध ठिकाणी २०२३मध्ये पर्यावरणाशी संबंधित घडलेल्या टोकाच्या घटना या जगाचे तापमान वाढत असल्याच्या अंदाजाला दुजोरा देणाऱ्या होत्या असा निष्कर्ष एका अभ्यास अहवालात काढण्यात आला आहे. या अभ्यासात गेल्या वर्षीच्या वातावरण आणि हवामानाचा आढावा घेण्यात आला आहे. त्यावरून जागतिक तापमान वाढत असल्याचे पूर्वीचे अंदाज खरे ठरत असल्याचे दिसत आहे असे संशोधकांनी नमूद केले आहे. २०२३ हे आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष म्हणून नोंदवले गेले आहे. अनेक ठिकाणी विक्रमी तापमान नोंदवले गेले तसेच चक्रीवादळांमुळे अतिमुसळधार पावसाच्या घटनाही आधी वर्तवलेल्या अंदाजानुसार घडल्याचे 'ॲडव्हान्सेस इन ॲटमॉस्फेरिक सायन्स'च्या अभ्यास अहवालात नमूद करण्यात आले आहे. याबरोबरच टोकाच्या घटना घडण्याच्या हंगामातील बदलाचेही संशोधकांनी निरीक्षण केले आहे. ब्रिटनच्या हवामान विभागातील अभ्यासक रॉबिन क्लार्क यांनी सांगितले आहे की, ''आपल्याला विशिष्ट ऋतूंमध्ये ज्या घटना होण्याची शक्यता कमी असते त्याही घडत आहेत. उदाहरणार्थ, २०२३च्या वसंत ऋतूमध्ये नैऋत्य युरोप, ब्राझील, मोरोक्को आणि दक्षिण आफ्रिकेमध्ये उष्णतेच्या लाटा आल्या.'' क्लार्क हे या अभ्यासाचे सहलेखक आहेत.

## मतदानाचा टक्का वाढण्यासाठी दुसऱ्या टप्प्यात खबरदारी; निवडणूक आयोगाकडून विशेष कृती गट




नवी दिल्ली: लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उष्णतेच्या लाटेमुळे तुलनेत कमी मतदान झाल्याने २६ एप्रिल रोजी होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून खबरदारी घेतली जात आहे. आयोगाने विशेष कृती गट तयार केला असून प्रत्येक टप्प्यातील मतदानाआधी पाच दिवस हवामानाचा आढावा घेतला जाणार आहे. दक्षिण आणि मध्य भारतामध्ये मार्चमध्ये तापमान ३४ ते ४० अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहिले होते. मात्र, एप्रिलमध्ये ते वाढून ३४ ते ४० अंशाच्या दरम्यान असेल. एप्रिलमध्ये दोन वेळा उष्णतेची लाट येऊ शकेल असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या पुढील सहा टप्प्यांमधील मतदानावर वाढत्या तापमानाचा विपरित परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन आयोगाने सोमवारी हवामान खात्यातील अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.। पान २ वर

## भाजप नको, बाकी कुणीही चालतील : शरद पवार

मुंबई : भाजपसोबत जायचं नाही ही आपली भूमिका या आधीही होती, आणि यापुढेही राहिल असं सांगत जर कुणाला परत यायचं असेल तर इंडिया आघाडीत यावं असं शरद पवार म्हणाले. जे सहकारी सोडून गेलेत त्यांना परत यायचं असेल तर यावं, फक्त भाजप नको अशी ठाम भूमिका शरद पवारांनी घेतली. या देशाची सत्ता पुन्हा भाजपकडे गेल्यास ती देशहिताची ठरणार नाही या निष्कर्षापर्यंत आम्ही आलो असून यावेळी लोक आम्हाला संधी देतील असा विश्र्वास शरद पवारांनी व्यक्त केला. शरद पवारांनी 'एबीपी माझा'सोबत संवाद साधताना हे वक्तव्य केलं.



२०१४ असेल वा २०१७ साली असेल, भाजपसोबत जायचा निर्णय हा शरद पवारांनीच घेतला होता, २०१९ च्या पहाटेच्या शपथविधीसाठीही त्यांचा पाठिंबा असल्याचं याआधी अजित पवारांनी सांगितलं होतं. त्यावर बोलताना शरद पवार म्हणाले की, २०१४ साली भाजपला पाठिंबा द्यायचं जाहीर केलं, पण तो दिला नाही, तो स्ट्रॅटेजीचा भाग होता. मात्र २०१७ साली शिवसेनेला भाजपपासून दूर करून उद्धव ठाकरेंसोबत जायचा आमचा प्लॅन होता, आणि नंतर तो यशस्वी ठरला. जे लोक आता म्हणतात की त्यावेळी भाजपसोबत जायचं ठरलं होतं, त्यांना भाजपसोबत जायचं नव्हतं तर सत्तेसोबत । पान २ वर

## नूरा लढतीसाठी प्रयत्नात असणाऱ्यांचा माझ्या उमेदवारीने अपेक्षाभंग : पाटील

सांगली : सांगलीमध्ये नूरा लढत व्हावी अशी अपेक्षा असलेल्यांचा अपेक्षाभंग माझ्या उमेदवारीने झाला असून मी जनतेचा उमेदवार असल्याचे विशाल पाटील यांनी सोमवारी सायंकाळी माध्यमांशी बोलताना सांगितले. लोकसभा निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवारी कायम ठेवल्यानंतर पाटील म्हणाले, काँग्रेस सांगलीच्या मैदानात असू नये असे षडयंत्र होते. गेले काही दिवस विविध नेत्यांशी चर्चा केली. भाजपचा पराभव करणे आवश्यक असल्याने मी जनमताच्या पाठिंब्यावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला.ते पुढे म्हणाले, मला हवे ते चिन्ह मिळू नये यासाठीसुध्दा प्रयत्न झाले. गेले काही दिवस विविध पक्षांतील नेत्यांशी संवाद साधून भावना जाणून घेतल्या. आता या नेत्यांना अडचणीत न आणता थेट मतदारांना भेटणार आहे. उद्या हनुमान जयंतीला मारुती दर्शनानंतर नृसिंहवाडीमध्ये दत्तदर्शन करुन थेट जतमध्ये प्रचाराला जातोय. जनतेने निवडणूक हाती घेतली आहे. मी कुणावरही टीकाटिपणी न करता माझी भूमिका जनतेपर्यंत पोहचवणार असून ते मला साथ देतील असा विश्र्वास वाटतो.

## पराभवाच्या भीतीने सोनिया गांधी राज्यसभेवर; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची टीका



जयपूर : जे लोक निवडणुका जिंकू शकत नाहीत, ते 'मैदानातून पळून गेले असून', राजस्थानमधून राज्यसभेवर आले आहेत, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांच्यावर टीका केली. देश काँग्रेसला त्याच्या 'पापांसाठी' शिक्षा करत असून, एके काळी चारशे जागा जिंकणाऱ्या या पक्षाला यावेळच्या लोकसभा निवडणुकीत तीनशे जागांवर लढण्यासाठी उमेदवार शोधणे कठीण झाले आहे, असे राजस्थानमधील जालोर येथे निवडणूक प्रचार सभेत बोलताना । पान २ वर

## कुर्ला वाहतूक नियंत्रण कक्षात मतदान जनजागृतीचा अभिनव उपक्रम

मुंबई : जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कुर्ला- नेहरूनगर आगार येथे सूचना केंद्रातून बस स्थानकावरील सर्व प्रवाशांनी कृपया इकडे लक्ष द्या! २० मे २०२४ रोजी आपल्या मतदान केंद्रावर जाऊन अवश्य मतदान करा!! अशी उद्घोषणा देऊन मतदारांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.



लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्ह्यात स्वीपचे नोडल अधिकारी डॉ. सुभाष दळवी यांच्या समन्वयाने जिल्ह्यात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून सातत्याने मतदारांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. सुट्टीच्या दिवशी प्रवाशांची गावी जाण्याची लगबग आणि त्यात १७४ कुर्ला (अ.जा.) विधानसभा मतदारसंघ कुर्ला- नेहरूनगर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगार बस स्थानकावरील ही उदघोषणा सर्व प्रवाशांचे लक्ष वेधून घेत होती.

बस स्थानकावर साधारण दहा हजाराच्या आसपास नागरिकांची वर्दळ रोजच असते. आपल्या गावी जाण्यासाठी बसची वेळ, मार्ग आणि बस कुठे लागली आहे. याबाबत आगारच्या सूचना केंद्रामधून सर्वसामान्य प्रवाशांना सातत्याने उद्घोषणा करून मार्गदर्शन करण्यात येते. या सूचना केंद्रामधून मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी आगार प्रमुख आणि तेथील अधिकारी व कर्मचारी हे 'सुजाण आणि जागरूक मतदार व्हा, लोकशाहीचे रक्षण करा' तसेच 'मतदान' आपली जबाबदारी आपला अधिकार, मजबूत लोकशाहीचा आधार' अशा नावीन्यपूर्ण उद्घोषणा देऊन प्रवासी मतदारांमध्ये जनजागृतीसाठी अनोखा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे मतदानाची टक्केवारी वाढविण्यास नक्कीच मदत होणार आहे.

कुर्ला विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी आखाडे- फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली कुर्ला नेहरूनगर आगार येथे हा उपक्रम राबविण्यात आला. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी आखाडे, स्वीप पथक प्रमुख सागर खुटवड, तसेच अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विनायक थविल यांनी आगार प्रमुख आणि तेथील अधिकारी यांना याबाबत सूचना दिल्या. आगार व्यवस्थापक दीपक हेतंबे, आगार प्रमुख दीपक जाधव व वाहतूक नियंत्रक कडवईकर यांच्या समन्वयाने सूचना केंद्रातून ही उद्घोषणा करण्यात येत आहे.

## सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी २६, ३० एप्रिल व ४ मे रोजी उमेदवाराच्या निवडणूक खर्चाची तपासणी होणार

सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभा सार्वत्रिक २०२४ निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक प्रचार कामी केलेल्या खर्चाची लेखांची तपासणी तीन वेळा करण्याबाबत भारत निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. ४२ - सोलापूर (अ.जा.) लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांची खर्च नोंदवही तपासणीसाठी वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. सदर खर्च तपासणी खर्च निवडणूक निरीक्षक यांच्या उपस्थित करण्यात येणार आहे.

उमेदवाराचे खर्च दि.२६, ३० एप्रिल आणि ०४ मे २०२४ रोजी तपासण्यात येणार आहे. ४२ - सोलापूर (अ.जा.) लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व उमेदवारांच्या लेख्यांची तपासणी शासकीय विश्रामगृह, सात रस्ता, सोलापूर येथे सकाळी १०.०० वाजले पासून करण्यात येणार आहे. सदर वेळापत्रकानुसार सर्व उमेदवारांनी आपल्या खर्चाचे लेखे आवश्यक त्या अभिलेख्यांसह तपासणीसाठी स्वत: किंवा प्रधिकृत प्रतिनिधीमार्फत उपलब्ध करावे. सदर तपासणी निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार अनिवार्य असल्याने सर्व उमेदवार किंवा प्राधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहावे, असे आवाहन ४२ - सोलापूर (अ.जा.) लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

खर्च तपासणीसाठी उमेदवाराचे खर्चाचे रजिस्टर मूळ प्रत, उमेदवार उमेदवारांच्या प्रतिनिधीच्या स्वाक्षरीनिशी उमेदवारांने प्रचारासाठी काढण्यात आलेल्या सर्व परवानग्या व त्यांची झेरॉक्स प्रत, निवडणूक प्रचारकामी करण्यात आलेली खर्चाच्या मूळ प्रमाणके,उपप्रमाणके तसेच त्यांची झेरॉक्स, निवडणूक कामी उघडण्यात आलेल्या बँक खात्याचे पासबुक,स्क्रोल व त्यांची झेरॉक्स प्रत, उमेदवारास निवडणूक कामी प्राप्त रक्कमा (राजकिय पक्ष, लोक वर्गणी इ.) या बाबत देणगी मंजुरीचे आदेश, जमेचे प्रमाणकांचे मूळ प्रती व झेरॉक्स प्रती, उमेदवारास निर्गमित केलेल्या नोटिशी व त्यांचा खुलासा (असल्यास) इत्यादी माहिती सोबत आणणे आवश्यक आहे.

सदर खर्च तपासणी वेळेस उमेदवार अथवा उमेदवाराचे प्रतिनिधीने न चुकता उपस्थित रहावे. उपस्थित न राहिल्यास उमेदवार विरुध्द लोक प्रतिनिधी अधिनियम १९५१ भारतीय दंड संहिता १८६०, व भारतीय निवडणूक आयोग यांचे निर्देशानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. असे निर्देश ४२ - सोलापूर (अ.जा.) लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

# संपादकीय

## हा प्रश्न कायम आहे...

सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील २१ निवृत्त न्यायाधीशांनी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांना न्यायपालिका कमकुवत करणारे गट सक्रिय झाल्याविषयी चिंता व्यक्त करणारे पत्र लिहिले आहे. नागरिकांना संविधानाने प्रदान केलेले अधिकार हिरावून घेतले जाण्याविषयीची आहे. देशातील काही घटक संकुचित राजकारण करत आहेत, हे वर्तन आपले हितसंबंध, वैयक्तिक लाभासाठी होत असल्याची चिंता पत्रातून व्यक्त केली गेली आहे. त्यातून न्यायवस्थेवरील लोकांच्या विश्वासाला तडा जाण्याची भीती पत्रातून व्यक्त केली आहे. न्यायालयीन प्रक्रियेवरील दबावाविषयीही न्यायाधीशांनी चिंता व्यक्त केली आहे. न्यायव्यवस्थेवरील दबाव हा थेट लोकशाहीवरील दबाव असल्याचे इथे स्पष्ट व्हावे, न्यायालये लोकशाहीचे संरक्षण करणारे अखेरचे आशास्थान असताना ही चिंता गंभीर आहे. न्यायालयात कर्तव्य बजावण्याआधी न्यायमूर्ती शपथ घेतात यात निष्पक्षतेचे तत्त्व महत्त्वाचे असते, व्यक्तीचा दर्जा, लिंग, जात, आर्थिक स्थिती अशा कुठल्याही फरकाचा परिणाम न्यायदानाच्या तत्त्वासमोर केला जाणार नाही, अशी ही शपथ असते. परंतु, न्यायाधीशांनी न्यायमूर्तींच्या या अधिकारावरही गदा आणली जाण्याची भीती व्यक्त केली आहे. त्यामुळे न्यायालयावरील नागरिकांचा विश्वास कमी होता कामा नये, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे. न्यायाधीशांनी व्यक्त केलेली चिंता समजून घेण्यासाठी आधी भारतीय संविधानातील समान न्यायाच्या तत्त्वाचे महत्त्व समजून घ्यावे लागेल. प्रास्ताविकात आम्ही भारतीय लोक अशी संकल्पना सुरुवातीलाच मांडली गेली आहे. हे लोक कोण आहेत? तर ते जात, धर्म, वंश, लिंग या पलीकडे केवळ नागरिक म्हणून ओळखले जाणारे समतेच्या मांडणीतील लोक आहेत. हे लोक स्वतःला हमी देत आहेत, ही हमी मोलाची आहे. भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकतंत्रात्मक गणराज्य घडवण्याची ही हमी आहे. विचार अभिव्यक्ती, श्रध्दा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य राज्यघटनेने दरेक नागरिकाला दिलेले असताना राज्यांच्या धार्मिक अस्मिता संस्कृतीवरील राजकीय, सांस्कृतिक आक्रमणाचा प्रयत्न हा विषय राज्याच्या स्थानिक श्रध्दा, विश्वास, उपासना स्वातंत्र्याचा संकोच करणारा आहे. विचार आणि अभिव्यक्तीविषयी चर्चा न झालेलीच बरी अशी स्थिती आज आहे. आजची राज्यातील आणि राष्ट्रीय प्रसारमाध्यमे किंवा समाजमाध्यमे ही खरेच निर्भीड अभिव्यक्तीचा आपला घटनात्मक अधिकार बजावत आहेत का? हा प्रश्न कायम आहे.

## आला उन्हाळा, तब्येत सांभाळा

सध्या सर्वत्र तापमान वाढत असून, उष्णतेच्या लाटेकडे दुर्लक्ष करू नये. उष्माघाताचे गंभीर परिणाम होतात. ते टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी आणि सुरक्षित राहावे. उष्णता, अति उष्णता, उष्माघाताची लाट यापासून बचाव करण्यासाठीच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आलेल्या सूचनांची माहिती या लेखात देण्यात आली आहे. सामान्य मानवी शरीराचे तापमान ३६.४ ते ३७.२ (९७.५ओऋ ते ९८.९ओऋ) दरम्यान असते.

**उष्णतेचा आरोग्यावर परिणाम**

**सामान्य लक्षणे** : सामान्यतः उष्णतेशी संबंधित (सौम्य ते गंभीर) आजारांमध्ये अंगावर पुरळ (अंगाला टोचणारी उष्णता), सूज (उष्णतेमुळे हात, पाय आणि घोट्याला सूज येणे), पेटके (उष्णतेमुळे स्नायूंमध्ये पेटके), उष्माघात, गोंधळल्यासारखे वागणे, काहीही न सुचणे, उष्णतेमुळे थकवा यांचा समावेश होतो. उष्णतेमुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी, श्र्वसन, किडनी रोगांसारख्या जुनाट आजारांवरील ताण देखील वाढू शकतो.

**अति उष्णतेमुळे शरीरावर परिणाम करणारी लक्षणे**

चक्कर येणे किंवा मूर्च्छा येणे, डोकेदुखी, मळमळ किंवा उलट्या, अति तहान लागणे, अतिशय गडद पिवळ्या लघवीसह लघवीचे प्रमाण कमी होणे, जलद श्र्वासोच्छवास आणि हृदयाचे वाढलेले ठोके

**उष्माघाताची लक्षणे** डोकेदुखी, ताप, उलट्या, जास्त घाम येणे आणि बेशुध्द पडणे, अशक्तपणा जाणवणे, शरीरात पेटके येणे, नाडी असामान्य होणे यासह प्रौढ व्यक्तिंमध्ये दिशाभूल, गोंधळासह बदललेली मानसिक संवेदना आणि चिडचिड, ॲटॅक्सिया, फेफरे किंवा कोमामध्ये जाणे, गरम, लाल आणि कोरडी त्वचा, शरीराचे तापमान ४०ओउ किंवा १०४ओऋ, धडधडणारी डोकेदुखी ही उष्माघाताची लक्षणे आढळतात. तर मुलांमध्ये आहार घेण्यास नकार, अति चिडचिडेपणा, लघवीचे प्रमाण कमी, तोंड कोरडे पडणे, शुष्क त्वचा आणि अश्रू न येणे / खोल गेलेले डोळे, सुस्ती/बदललेल्या संवेदना, चिंता, चक्कर येणे, मूर्च्छा येणे आणि डोके हलके होणे, जखडणे, शरीराच्या कोणत्याही भागातून रक्तस्त्राव, स्नायू कमकुवत होणे किंवा पेटके येणे, मळमळ आणि उलटी, जलद हृदयाचे ठोके / श्वास घेण्यास त्रास ही लक्षणे आढळतात.

**उपाय** : उष्णतेचा त्रास झालेल्या व्यक्तीची मदत करत असताना या गोष्टींचा अवलंब करावा –

संबंधित व्यक्तीला थंड ठिकाणी तातडीने हलवावे. शरीराच्या जास्तीत जास्त भागावर किंवा कपड्यांवर थंड पाण्याचा मारा करावा. शक्य असेल तेवढा वेळ त्या व्यक्तीला वारा घालावा.

**उष्माघाताची लक्षणे आढळल्यास ही काळजी घ्या –**

व्यक्तीला सावलीच्या ठिकाणी झोपवावे. व्यक्तीचे कपडे सैल करावेत. त्याला द्रव पदार्थ, कैरीचे पन्हे पाजावे. तापमान कमी करण्यासाठी थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. बाधित व्यक्तीला




तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जावे आणि वैद्यकीय सल्ला घ्या.

**उष्माघाताचा त्रास झाल्यास करावयाचे प्रथमोपचार –**

त्रास झालेल्या मुलाला/मुलीला लगेच घरात/सावलीत आणावे. संवेदनशील राहून त्यांचे कपडे सैल/ढिले करावेत. नळाच्या पाण्याने ओल्या केलेल्या पट्ट्या शरीरावर ठेवाव्यात. उलटी होत असल्यास त्यांना एका कुशीवर वळवावे, जेणेकरून ते गुदमरून जाणार नाहीत. हवा येण्यासाठी पंख्याचा वापर करावा. पायांखाली उशी किंवा तत्सम काही ठेवून त्यांना आडवे पडायला सांगावे. मूल जागे असल्यास वारंवार साफ आणि थंड पाण्याचे घोट पाजावेत. मूल बेशुद्ध असल्यास त्यांना खायला / प्यायला काहीही देण्याचा प्रयत्न करू नये.

**उष्माघातापासून बचाव –**

**काय करावे ?** : अतिउष्णतेच्या परिस्थितीत सर्वसामान्य जनतेने हायड्रेटेड राहणे गरजेचे आहे. त्यासाठी तहान लागली नसली तरीही जेव्हा शक्य असेल तेव्हा पुरेसे पाणी प्यावे. तसेच प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. भरपूर ताजे व हलके अन्न खाल्ल्यानंतरच घरातून बाहेर पडावे. फळे आणि सलाड सारखे पचायला हलके असणारे अन्न खावे.

पातळ, सैल, सुती, आरामदायी शक्यतो फिकट रंगाचे कपडे परिधान करावेत. उन्हात बाहेर जाताना डोके झाकावे. टोपी/कपडा/छत्रीचा वापर करावा. भरपूर पाणी, ओ. आर. एस. पाण्याचे द्रावण, ताक किंवा लस्सी, लिंबूपाणी, कैरीचे पन्हे इत्यादी घरगुती पेय घ्यावे. थोडेसे मीठ घालून फळांचा रस घ्यावा. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोशिंबिर, इतर स्थानिक उपलब्ध फळे आणि भाज्या यासारख्या उच्च पाण्याचे प्रमाण असलेली हंगामी फळे आणि भाज्या खाव्यात. सूर्यप्रकाशात उन्हात बाहेर जाताना शूज किंवा चप्पल घालावी.

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या (IMD) do~gmBQ> https://mausam.imd.gov.in/वर हवामानाची अद्ययावत माहिती मिळवावी. शक्य तितके चांगल्या हवेशीर आणि थंड ठिकाणी, घरामध्ये, सावलीत राहावे. थेट सूर्यप्रकाश आणि उष्णतेच्या लाटांना अडथळा निर्माण करावा. शक्यतो तुमच्या घराच्या ऊन येणाऱ्या बाजूच्या खिडक्या आणि पडदे दिवसा बंद ठेवा, रात्री थंड हवा येण्यासाठी खिडक्या उघडाव्यात. घराबाहेर जात असल्यास, तुमची बाहेरील कामे दिवसाच्या थंड वेळेपर्यंत म्हणजे सकाळी आणि संध्याकाळी मर्यादित करा. दिवसाच्या थंड वेळेमध्ये बाहेरच्या कामांचे वेळापत्रक किंवा नियोजन करावे.

उष्णतेचा त्रास आणि उष्णतेशी संबंधित आजाराचा अति धोका असतो, अशा जोखमीच्या लोकांकडे अतिरीक्त लक्ष दिले पाहिजे. यामध्ये लहान मुले आणि बालके, घराबाहेर काम करणारे लोक, शारीरिकदृष्ट्या आजारी, विशेषतः हृदयरोग किंवा उच्च रक्तदाब, गर्भवती महिला, ज्या लोकांना मानसिक आजार आहे अशा व्यक्तिंचा समावेश होतो. थंड हवामानापासून उष्ण हवामानापर्यंतच्या भागात प्रवास करणाऱ्यांनी त्यांच्या शरीराला उष्णतेला अनुकूल होण्यासाठी एक आठवडा वेळ द्यावा. उष्ण वातावरणात एक्सपोजर/शारीरिक क्रिया हळूहळू वाढल्याने (१०–१५ दिवसांपेक्षा जास्त) अनुकूलता प्राप्त होते.

**काय करू नये?**

रिकाम्या पोटी उन्हात बाहेर पडू नये. उन्हात अधिक वेळ राहू नये. तिखट मसालेदार आणि शिळे अन्न खाऊ नये. शरीरात पाण्याची कमतरता पडू देऊ नये. ताप आल्यास थंड पाण्याची पट्टी ठेवावी. कूलर किंवा एअर कंडिशनर्समधून थेट उन्हात बाहेर पडू नये. उन्हात विशेषतः दुपारी १२:०० ते ०३:०० दरम्यान बाहेर पडणे टाळावे. दुपारच्या वेळी बाहेर पडताना अति परिश्रमाची कामे टाळावीत. अनवाणी बाहेर जाऊ नये. अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड शीतपेये किंवा मोठ्या प्रमाणात साखर असलेली पेये टाळावीत, कारण यामुळे शरीरातील द्रवपदार्थ जास्त प्रमाणात कमी होतात किंवा पोटात पेटके येऊ शकतात. पार्क केलेल्या वाहनात लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना एकटे सोडू नये. वाहनातील तापमान धोकादायक ठरु शकते. शरीराचे तापमान वाढलेले, बेशुद्ध, गोंधळलेले आदि व्यक्ती आपल्या नजरेस आल्यास १०८/१०२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**स्त्रोत –**

**सार्वजनिक आरोग्य विभाग,**

**संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक**

पान १ वरुन

## सोलापुरात २१ तर माढ्यात..

समावेश आहे. या मतदारसंघात १८ मतदान केंद्रे संवेदनशील असून यात माणमध्ये सर्वाधिक ९ मतदान केंद्रे करमाळ्यातील आहेत. तर ५ मतदान केंद्रे माण येथील आहेत. फलटण–२ आणि माढा व सांगोल्यात प्रत्येकी १ मतदान केंद्र संवेदनशील आहे. मोहिते–पाटील यांचे प्राबल्य असलेल्या माळशिरस तालुक्यात एकही मतदान केंद्र संवेदनशील नाही. निवडणूक अधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांनी ही माहिती दिली.

## वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार

जनतेलाही मी भेटलो. आंबेडकरी चळवळ माझ्या डीएनएमध्ये आहे. मी गेल्या पंधरा दिवसांत खूप काही अनुभवले आहे. या पंधरा दिवसांत मी जे अनुभवले ती चळवळ नाही. सोलापुरातील भोळीभाबडी जनता आंबेडकर या एका नावासाठी भावनिक आहे.जनतेला आंबेडकरांबद्दल आदर आहे. पण पंधरा दिवसांच्या कालावधीत मला समजलं की, चळवलीसाठीची फळी पोकळ आहे. ही फळी पोषक नाही, अशा भावना राहुल गायकवाड यांनी व्यक्त केल्या.

सोलापुरातील कार्यकारिणीचा स्वार्थ आजही तेवढाच घट्ट आहे. तिथे मला बाबासाहेबांचे स्वप्न दिसत नाहीत. मी सोलापूरच्या मैदानात लढण्यासाठी उतरलो होतो. पण माझ्यासाठी लढणारी ही फळी पाहून मला असे वाटतेय की, मला मैदानात सोडलेय. माझ्या हातात बंदुक दिली आहे. पण त्या बंदुकीत गोळ्या नाहीत. त्या बंदुकीत छरे आहेत. या छऱ्यांच्या मदतीने मी युद्ध लढवेन पण ते मी जिंकू शकणार नाही, असेही राहुल गायकवाड यांनी सांगितले.

मी जर अर्धवट लढलो तर भाजपच्या कार्यकर्त्याला मदत करतोय, असे वाटतेय. भाजपच्या उमेदवाराला सोईचं वातावरण निर्माण होईल का, अशी मला भीती वाटत आहे. भाजपचा एक नेता माझ्यामुळे संसदेत जाईल. संविधानाला धोका निर्माण होईल, असे माझ्याकडून काही होऊ नये असे मला वाटते, असे थेट स्पष्टीकरण राहुल गायकवाड यांनी दिले.दरम्यान, गायकवाड यांच्या या निर्णयामुळे सोलापूर मतदारसंघाच्या निवडणुकीचे गणित बदलणार आहे. २०१९ सालच्या निवडणुकीत या जागेवर वंचितच्या तिकिटावर प्रकाश आबंबेडकर यांनी निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत आंबेडकरांना एक लाख ७० हजार मते मिळाली होती. याचा फटका सुशीलकुमार शिंदे यांना बसला होता. त्यांचा या निवडणुकीत पराभव झाला होता. यावेळीदेखील वंचितने येथून राहुल गायकवाड यांना तिकीट दिले होते. त्यामुळे त्याचा फटका काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना बसण्याची शक्यता होती. मात्र आता गायकवाड यांनी माघार घेतल्यामुळे प्रणिती शिंदे यांना त्याचा फायदा होणार आहे.

## मतदानाचा टक्का वाढण्यासाठी..

हवामान खाते केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सतत संपर्कात असून हंगामी अंदाजासह दरमहा, दरआठवडा व दररोज अशा तीन प्रकारच्या अंदाजांची माहिती दिली जात आहे. मतदान होत असलेल्या भागांतील तपशीलवार माहिती, उष्णतेची लाट आणि आद्रता पातळी आदीचे अंदाजही दिले जात आहेत, असे हवामान खात्याचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी बैठकीनंतर सांगितले. ' आयोगाने राज्यातील आरोग्य मंत्रालयाही निर्देश दिले असून उष्णतेच्या संभाव्य लाटेमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी निवडणूक आयोगाला मदत करण्याचे व आवश्यक सुविधा पुरवण्याची सूचना करण्यात आली आहे. ' मतदान केंद्रावर शामियाना, पिण्याचे पाणी, पंखे आणि इतर किमान सुविधा पुरवल्या जातील. त्यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोग राज्याच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची स्वतंत्र आढावा बैठक घेणार आहे.

## पराभवाच्या भीतीने सोनिया

मोदी म्हणाले.जे लोक निवडणूक लढवू शकत नाहीत, निवडणूक जिंकू शकत नाहीत, ते मैदानातून पळून गेले आहेत. या वेळी ते राजस्थानमधून राज्यसभेवर आले आहेत. काँग्रेसची परिस्थिती इतकी वाईट आहे', असे मोदी यांनी सांगितले. मतदानाच्या पहिल्या टप्प्यात निम्म्या राजस्थानने काँग्रेसला दंड केला आहे. काँग्रेस कधीही देशाला मजबूत बनवू शकत नाही हे देशभक्तीने युक्त असलेल्या राजस्थानला ठाऊक आहे', असे मोदी म्हणाले. २०१४ पूर्वी अस्तित्वात असलेली परिस्थिती परत यावी असे देशाला वाटत नाही, असेही त्यांनी नमूद केले. काँग्रेसने भाईभतिजावाद आणि भ्रष्टाचार यांची वाळवी पसरवून देशाला पोकळ करून टाकले आहे, असा आरोपही त्यांनी केला.

## भाजप नको, बाकी कुणीही ..

जायचं होतं. निवडणुकीमध्ये सून आपल्या विरोधात उभी राहिली, त्याचा काही त्रास नाही, लोकशाहीत तो प्रत्येकाचा अधिकार असल्याचं शरद पवारांनी स्पष्ट केलं. बारातमीत कोण निवडून येणार, काय अंदाज असेल असा प्रश्र्न केल्यावर शरद पवार म्हणाले की, अंदाज बिंदाज मी सांगत नसतो, मी ॲक्शन घेत असतो.

## क्रीडा सह्याद्री उन्हाळी शिबिरास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



निफाड/प्रतिनिधी : क्रीडा सह्याद्री निफाड ,मार्शल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट ऑफ मार्शल आर्ट (इंडिया), नाशिक टेनिस क्रिकेट असोसिएशन ,क्रीडा प्रबोधिनी, सरस्वती विद्यालय,निफाड आयोजित १५ दिवसीय उन्हाळी क्रीडा शिबीर सरस्वतीच्या प्रांगणात उत्साहात सुरुवात झाली उन्हाळी क्रीडा शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी निफाड इंग्लिश स्कूलचे नंदलालजी चोरडिया ,महाराष्ट्र राज्य टेनिस क्रिकेट सचिव मिनाक्षी गिरी ,सरस्वती मुख्याधापिका श्रीमती ज्योती भागवत ,नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन सचिव विलास गायकवाड, क्रीडा शिक्षक दत्तू रायते,क्रीडा सह्याद्री सदस्य रोहन राऊत ,श्याम चौधरी .चेयन कुंदे उपस्थीत होते या शिबिरात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला असून शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे या प्रसंगी क्रीडा सह्याद्री अध्यक्ष व नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट सचिव गायकवाड यांनी स्पर्धा व खेळाचे महत्त्व पटवून दिले ग्रामीण भागातील खेळाडूंच्या कलागुणांना वाव मिळावा व सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, यादृष्टीने खो–खो, रोप मल्लखांब ,रायफल शूटिंग,कबड्डी, बॉक्सिंग,हॅन्डबॉल, हॉलीबॉल,योगा,आर्चरी, लगोरी व अन्य मैदानी स्पर्धा तसेच मुलींना त्यांच्या स्वसंरक्षणासाठी कराटे चे प्रशिक्षण देण्यात येणार आहे शिबिरार्थींना क्रीडाशिक्षक गायकवाड यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करणार आहे शिबिराला मार्गदर्शन करण्यासाठी दत्तू रायते ,रमेश वडघुले ,चेतन कुंदे, श्याम चौधरी ,अक्षय थेटे , सुयश कुंभार्डे,यांचे शिबिराला मोलाचे मार्गदर्शन लाभणार असून हे शिबिर यशस्वी करण्यासाठी निशिगंधा शिंपी, वैशाली काळे, प्रतिभा महाजन, सविता गुंजाळ,ज्योती सांगळे, अश्र्विनी गांगुर्डे, शारदा काजळकर, छाया चव्हाण, निलम बेंडकुळे क्रीडा शिक्षिका प्रतिक्षा कोटकर ,क्रिती कोटकर ,,सुमेध बोदडे ,, विजय घोडेकर , लखन घडमाले आदिनाथ खंडारे,कार्तिक मोरे आदि शिक्षिका व पालकवर्ग उपस्थित होते. यावेळी निलम बेंडकुळे यांनी सूत्रसंचलन केले .

खेळाचे मैदान म्हणजे जीवनाला वळण व आनंद देणार सुंदर ठिकाण..,आजचे युग हे आधुनिक युग आहे. आणि या बदललेल्या जीवनशैलीमुळे मनुष्य शारीरिक कष्ट व शुद्ध मोकळी हवा यापासुन कोसो दुर झालेला आहे. आज सर्व वयोगटातील व्यक्तिवरील तणाव दिवसेंदिवस वाढतच आहे. परिणामी प्रत्येक मनुष्यात मानसिक,शारीरिक व भावनिक असंतुलन वाढत आहे आणि यामुळे अनेक आजारांचे प्रमाण वाढलेलं आहे. म्हणूनच व्यक्तिच्या विकासात शारीरिक क्षमता वाढवण्याकरता खेळाला महत्व दिले पाहिजे आणि त्याकडे गंभीरतेने बघितलं पाहिजे. आत्मविश्र्वास वाढीसाठी देखील खेळाचे स्थान आपल्या जीवनात आवश्यक आहे. विविध शारीरिक हालचालींमुळे, खेळांमुळे मुलांवरील ताणतणाव कमी होतो. आणि म्हणूनच शारीरिक क्षमतेसाठी नियमीत मैदानी व्यायाम करणे अतिशय गरजेचे आहे **विलास गायकवाड,क्रिडा शिक्षक नाशिक टेनिस क्रिकेट सचिव**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नळदुर्ग वागदरी व परिसरात वादळीवाऱ्यासह पावसाने झोडपले शेती पिकांचे नुकसान व फळझाडांचे नुकसान



वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग वागदरीसह परिसरात वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाने झोडपले असून यामुळे शेती पिकांचे व फळझाडांचे मोठे नुकसान झाले.अनेकांच्य घरांवरची पत्रे उडून गेले,झाडे जमिनीवर कोसळली त्यामुळे वित्तहानी झाली मात्र कोठेही जिवीतहानी झाल्याचे समजले नाही. दि.२० एप्रिल २०२४ रोजी सकाळ पासुन तापमान वाढलेले होते.मोकळ्या हवेत देखील गरम हवा होती. पंख्याखाली बसले तरी गरम हवा त्यामुळे एसी.किंवा कुलरचा वापर करणारे मोजके लोक सोडले तर बाकी सर्व सामान्य माणसाचा गरमीमुळे जीव कासावीस होत होता.त्यामुळे हवामानाचा अंदाज ऐकण्याची कोणालाही गरज पडलेली नाही.प्रत्येकजन म्हणत होता की आज संध्याकाळी मोठा पाऊस पडणार नेमके तसेच झाले.दुपारी ठिक ३.०० वाजल्यापासून आकाशात हळुहळू ढग भरून येत होते.हलकाशा थंड वारा ही सुटला आणि पाऊस पडणार याची खात्री पटली.बघताबघता पावसाचे थेंब ही पडायला सुरुवात झाली.सकाळ पासुन गर्मी ने कासावीस झालेल्या माणसाला थोडं फार बरं वाटतं होतं पण दुपारी चारपाच वाजल्यापासून हलक्या वाऱ्याने उग्र रूप धारण केले पावसाच्या थेंबाचे मुसळधार पावसात रूपांतर झाले.विजेचा कडकडाट सुरू झाला.वादळीवाऱ्यास पावसाने नळदुर्ग वागदरी व परिसरास झोडपले.वादळी वाऱ्यामुळे अनेक झाडे जमीन दोस्त झाली.शेती पिकांचे ऊसाचे अंबा वगैरे फळ झाडाचे मोठे नुकसान झाले.गावागावाती घरावरचे पत्रे उडून गेले.शेतातील पत्र्याचे शेड उडून गेले त्यामुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली पण जिवितहानी कोठे झाल्याचे समजले नाही.पाणी टंचाईचा सामना करण्याऱ्याना या अवेळी पडलेल्या पावसाने थोडाफार दिलासा मिळाला असला तरी पाणी टंचाईची समस्या पुरेसा पाऊस आल्याशिवाय मिटणार नाही.हे तितकेच खरे आहे.




# पंढरपुरातून धारकरी शिवभक्त रायगड वरील छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्याकरिता निघाले

पंढरपूर /प्रतिनिधीः पुण्यश्रलोक छत्रपती शिवाजी महाराजांना श्री क्षेत्र रायगड येथे शिव पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमानिमित्त पंढरपुरातून चारशे धारकरी शिवभक्तांची दिंडी श्री शिव समाधीला नतमस्तक होणार ५१ पखवाज डब्बा तबला यांची मानवंदना देण्यासाठी बाल शिवभक्त राज सिद्धेश्र्वर महामंडळांना देणार त्याचबरोबर होळीच्या माळावर मार्गाने खेळायचे प्रात्यक्षिक होऊन पुण्यश्रलोक छत्रपती शिवाजी महाराजांच्या शूरवीर स्मृतींना अभिवादन करणार त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचे पोवाडे व देशभक्तीपर गीते फोन संगीत वादनाने मानवंदना देणार चाळीस वर्षाची परंपरा जपणारे श्री शेत्र पंढरपूर येथील शिवभक्त प्रतिष्ठान अनोख्या पद्धतीने पुण्यश्रलोक छत्रपती शिवाजी महाराजांना बांधवंदना कार्यक्रमात दरवर्षी हजर असेल आणि मर्दानी खेळाची प्रात्यक्षिके सादर करत असतात पंढरपूरतील अनेक शिवभक्तांच्या मदतीशिवाय हा पुण्यस्मृति अभिवादन कार्यक्रम होणे शक्य नसून पंतप्रधान आणि शिवभक्त यासाठी पुन्हा फुलांची पाकळी मदत करतात २०१८ च्या शिव पुण्यस्मृती रायगड पुरस्कारही या संस्थेला मिळाला असून अविरतगड स्वच्छता वृक्षारोपण गडकोट किल्ल्याची संवर्धन दर्शनी फलक व्यवस्था असे अनेक उपक्रम शिवभक्त पचितांच्या माध्यमातून होत असतात

# पाणी प्रश्न सोडविण्यासाठी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे मोलाचे सहकार्य

पंढरपूर/प्रतिनिधीः गेल्या पाच वर्षात सांगोला विधानसभा मतदारसंघाचा कोणत्या विकास मार्गे लावला असून शाश्र्वत विकास हे घेणे डोळ्यासमोर ठेवून विकास कामे करतो सुरू आहे ते विकासाचा तसेच शिवसेनेचा दाखला भरून काढत असताना सर्वसामान्य शेतकरी जनतेची मूलभूत प्रश्र्नांना प्राधान्य देत पाण्याचा प्रश्र्न सोडून हरितक्रांतीला चालना दिले आहे रखडलेल्या विकासाच्यांना देण्यासाठी गेल्या पाच वर्षात खोट्यावधी रुपये निधी उपलब्ध केला आहे तालुक्याच्या पाणी प्रश्र्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी खासदार रणजीत हे नाईक निंबाळकर यांची मोलाचे सहकार्य लाभले असून गेल्या ५५ वर्षातील सिंचनाचा बॅकलॉग पाच वर्षात भरून काढला असलेली माहिती आमदार शहाजी बापू पाटील यांनी दिली आहे




गेल्या ५५ वर्षात सांगोला विधानसभा मतदारसंघाचा अपक्ष प्रमाणे विकास झालेला नाही व शेतकऱ्यांच्या हिवाळ्याचा पाणी प्रश्र्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता मतदारसंघातील मतदारांनी मोठ्या अश्रिवनी मला विधानसभेत पाठवलेली मी गेल्या पाच वर्षात टेम्पो म्हैसाळ निराहुवा कालवा स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपस्थित योजना या सिंचन प्रकल्पांना कुठल्या निधी मंजूर झाला आहे मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हेच मुख्यमंत्री आहे मतदारसंघात रस्ते पाणी प्रश्र्न वीज पुरवठा यांसह अनेक विकास कामे हाती घेतले आहेत आणि कमी पूर्ण केले आहेत इंग्रजांच्या काळात बांधलेल्या शासकीय विश्रामगृह तहसील कार्यालयाचा निधी उपलब्ध करून नूतनीकरणाचा सर्व शासकीय कार्यालय एकाच छताखाली आणण्यासाठी प्रशासकी इमारतीचे काम

सांगोला तालुक्यातील वंचित बारा गावांसाठी वर्धा येणे असलेली मात्र जवळपास सतरा वर्षांपासून असणार गुंडाळलेली सांगोला उपसा सिंचन योजना प्राप्त करून देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार कडे वारंवार पाठपुराव केला व बहुपदीची सादर योजनेची स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेचे नामकरण करून तब्बल ८८३ कोटी रुपयाचा खर्चाच्या योजनेला मंत्रिमंडळाचे मान्यता मिळाली असूनही योजनेसमोर ३९ हजार एकर शेती खाली येणार आहे . मतदारसंघातील विकासाच्या बॅकलॉग भरून काढण्यासाठी कोट्यावधी रुपये निधी खर्च झालाय सर्वसामान्य शेतकरी जनतेच्या मूलभूत प्रश्र्नांना प्राधान्य देत पाण्याचा प्रश्र्न सोडवून हरितक्रांतीच्यांना दिल्यावर सांगोला

शहरातील एकदा मैदानाचा मतदारसंघातील मुस्लिम समाजाचे विकास आहे कामासाठी दहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे सांगोला तालुक्यातील पाणीपुरी तसेच इतर विकास कामे लावण्यासाठी खासदार यांचे नाही निंबाळकर यांनी मोलाची सहकार्य केले त्यामुळे येणारे लोकसभा निवडणूक माहिती उमेदवार खासदार रणजीचे नाही निंबाळकर यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आव्हान आमदार शिवाजी बापू पाटील यांनी केले आहे

# भगवान महावीर जयंती निमित्त आ.प्रणिती शिंदे यांनी दिगंबर जैन मंदिरात जाऊन घेतले दर्शन

पंढरपूर/ प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांनी भगवान महावीर जयंती निमित्त रविवारी शहरातील दोन्ही जैन मंदिरात जाऊन दर्शन घेतले व अहिंसा या तत्त्वावर जैन धर्माची उभारणी झालेल्या जैन धर्मने सर्वांना जाण्याचा अधिकार असल्याचा विचार समाजात रुजवला असल्याची भावना प्रणिती शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले.भगवान महावीर हे जैन धर्माचे शेवटचे म्हणजेच २४ वी तीर्थकार मानले जातात चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील त्रियोदशी कितीला भगवान महावीरांचा जन्म झाला असे म्हणले जाते रविवारी २१ एप्रिल



रोजी सोलापूर मध्ये जैन धर्म नागरिकांनी मोठ्या उत्साहात भगवान महावीर जयंती साजरी केली यावेळी प्रणिती शिंदे यांनी बोलणे मंदिरातील उपस्थिती लावत दर्शन घेतले तसेच जैन धर्मियांच्या वतीने काढण्यात आलेल्या रथयात्रेत सहभागी होऊन सर्वांनी जय जिनेन्द्र मनात महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पराग शहा राजेंद्र कासवा पदमराका बाहुबली भूमकर मिलिंद म्हेत्रे राहुल शहा मनीषा सुनील सोनी मिनिटे जितेंद्र नंदकुमार कागले आदी मान्यवर उपस्थित होते

# कोळीगीते पांडुरंग परिवाराची विचार विनिमय बैठक

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहर सोलापूर जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्र्न सोडवण्यासाठी मोदी सरकार तिसऱ्यांदा सुट्टीवर येतात भीमा नदीवर ब्रॉडगेज बंधारे बांधण्यात येणार आहेत अशी माहिती माजी आमदार प्रशांतराव परिचय यांनी दिली सोलापूर लोकसभा निवडणुकीबाबत पांडुरंग परिवाराचे सतरा गावांची विचारविनिमय बैठक म्हणून येथे पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती राजू गावडे यांच्या निवास सुरू झाली यावेळी व्यासपीठावर



मोर्चा आमदार यशवंत माने माजी आमदार राजन पाटील भाजप व महामृत्युंजय उमेदवार आमदार राम सातपुते राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रकाश चौरे माजी सभापती दिलीप घाडगे माझी चेअरमन दिनकर मोरे दिलीप चव्हाण सभापती हरीजी गायकवाड सोबत प्रशांत देशमुख पंडित भोसले संतोष घोडके सुनील भोसले फोन करा तानाजी पवार पंडित रोकडे महादेव बागल महादेव लवटे नागनाथ मोहिते बाबासो पाटील आधी उपस्थित होते

यावेळी माजी आमदार प्रशांतराव परिचारक म्हणाले की भाजप सरकारने स्वच्छ पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी तीन लाख कोटी रुपये ची योजना मंजूर केली याची कामे आज गावागावी चालत या माध्यमातून ६५ कोटी कुटुंब शुद्ध पाणी मिळणारे ८० कोटी लोकांना पुढील पाच वर्ष रेशन भाजप सरकार मोफत देणार आहे ७५ हजार कोटी रुपये खर्च करून शेतकरी पेन्शन दिले जाते यामध्ये कुठल्याही प्रकारच्या भ्रष्टाचार नव्हता पैसे तेच शेतकऱ्यांच्या खात्यावर येतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारमध्ये भत्ता द्यायला बसलेली माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी या प्रसंगी म्हणा

शेतकऱ्यांना एक हजार रुपयांच्या युरिया फक्त अडीचशे रुपयांमध्ये मिळतो मोदी सरकार मुळे हे शक्य झाले रस्त्याची कामे भूगोल गॅस योजना प्रधानमंत्री आवास योजना सरकारने राबवले सत्तर वर्षांवरील व्यक्तींना मोफत उपचार ३२० मोफत आहे अनेक योजना आगामी काळात येणार आहे त्याकरिता मतदारांनी भाजप आणि माहितीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना विजयी करावे असे आव्हाने माजी आमदार प्रशांत प्रचार

माजी आमदार राजन पाटील म्हणाले की कृष्णा भीमा नदीचे पाणी दुष्काळी भागासाठी देण्याकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी आगरे आहेत आणि मोदीजी तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून निवडून येणार आहे त्यावेळी सोलापूरकरांना नरेंद्र मोदी यांना

भाजप आणि माहितीचे उमेदवार आमदार राम सातपुते म्हणाली की ऊसतोड कामगारांचा मुलगा आहे गोरगरीब जनतेच्या प्रश्र्नांची जाणीव मला आहे त्यामुळे आगामी काळातील सर्वसामान्य जनतेच्या प्रश्र्नाचे सोडवणूक करण्याचा प्राधान्य दिले असेल याकरिता सोलापूरकर यांनी भाजप आणि माहितीच्या पाठीशी राहावे असे आमदार राम सातपुते

# चैत्री एकादशी निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची नित्य पूजा संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः चैत्री शुद्ध कामदा एकादशी निमित्त मंदिर समितीच्या वतीने श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची नित्यपूजा संपन्न झाली. श्री विठ्ठलाची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे यांनी, तर रुक्मिणी मातेची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प प्रकाश महाराज जंवजाळ यांनी केली.



वारकरी संप्रदायातील महत्त्वाची वारीपैकी चैत्री वारीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या गर्भगृहाचे संवर्धन करण्याचे काम सुरू असल्याने भाविकांना मुख दर्शन सुरु ठेवण्यात आले आहे. चैत्री एकादशीला भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीच्यावतीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या असून, समितीच्या वतीने दर्शनरांगेत व दर्शन मंडपात, शुध्द पिण्याचे पाणी, शौचालये, लाइव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दर्शनरांग, दर्शनमंडप, मंदिर व मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग या ठिकाणची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे.

श्रीच्या गर्भगृह संवर्धन कामांची पाहणी काम वेळेत पूर्ण करण्याच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या सूचना श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या गर्भगृहाचे संवर्धन करण्याचे काम सुरू असून, सदर ठिकाणच्या कामांची मंदीर समितीच्या सर्व सदस्यांनी पाहणी केली. यावेळी संबधित ठेकेदाराने नेमून दिलेल्या वेळेत दर्जेदार काम करावे. तसेच पुरातत्व विभागाने व संबंधित ठेकेदाराने यासाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळ वाढवावे अशा सूचना सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिल्या.तदनंतर आराखड्यातील कामासंदर्भात सह अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ९.३० वाजता मंदिर कार्यालयात सभा संपन्न झाली. या सभेस सदस्या शकुंतला नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्र्वर देशमुख जळगावकर, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, दूरदृष्यप्रणालीद्वारे डॉ. दिनेशकुमार कदम, ह.भ.प.भास्करगिरी महाराज, भागवतभूषण अतुलशास्त्री भगरे गुरुजी, पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, विभाग प्रमुख बलभीम पावले, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे व कामाचे ठेकेदार उपस्थित होते.

या वेळी श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेचा गाभारा तसेच सोळखांबी येथील सर्व लाकडी दरवाजांना देणगीदारांमार्फत चांदी लावणे. तसेच विठ्ठल सभा मंडप येथील संवर्धनाचे काम आषाढी यात्रे पूर्वी पूर्ण करणे. याशिवाय, दर्शन रांगेतील कायमस्वरूपी उभारण्यात आलेल्या ४ पत्राशेडचे नूतनीकरण करणे, श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे विद्युत व्यवस्थेसाठी सोलर पॅनल बसवणे इत्यादी निर्णय घेण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# सोपल गटातील असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

बार्शी/प्रतिनिधी : शहरातील सोपल गटातील असंख्य कार्यकर्त्यांचा आमदार राजेंद्र राऊत यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

बार्शी शहरातील राऊळ गल्ली येथील सोपल गटाचे युवा नेतृत्व राजेश रूनवाल यांनी त्यांचे समर्थक सुशांत पाटील, राहुल शहागडकर,वैभव सोत्रे, आकाश शेटे,सर्जू काशीद,रोहन रुनवाल, विशाल चव्हान, संकेत भूईटे, समर्थ शाहगडकर, प्रसाद खराडे, वैभव जाधव,भोला पवार,सूरज आंधळकर, विनोद दरेकर,राहुल घोंगडे, विनोद झाडे, सागर शेटे,ओंकार गोनेकर, केदार दरेकर,प्रमोद सुरवसे, अजय सुपेकर,शुभम बरिदे, शुभम घोलप,शिवराज शहागडकार, रोहित तोडकरी,करण मोरे, ऋषी साठे,गौरव मेटे,अशोक वाव्हणे, सावणे,विष्णू काशीद, अमोल सूरवसे,सनी नामदास, गणेश साखरे, आदेश पवार, विष्णू काशीद, अजय राऊत, पवन इटकर, प्रसाद कुलकर्णी, महेश भोसले,अमित सुपेकर यांच्यासह भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.आमदार राजेंद्र राऊत यांनी सर्वांचे स्वागत व सत्कार केला,यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील,माजी नगरसेवक विलास(आप्पा) रेणके, प्रशांत कथले मालक,कुंडलिक गायकवाड, बाबासाहेब मोरे, लोमटे मामा तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# आ.आवताडे यांच्या माध्यमातून ग्रामपंचायत सदस्य व अनेक कार्यकर्त्यांनी केला भाजपमध्ये प्रवेश

मंगळवेढा/प्रतिनिधीः ग्रामपंचायत शिरनांदगी या गावातील भालके गटाच्या ग्रामपंचायत सदस्य तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य आणि कार्यकर्त्यांनी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या नेतृत्वावर आणि कार्यपद्धतीवर विश्र्वास ठेवून ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, काशीराम कोळेकर, रमेश ऐवळे, अतुल चोपडे व दत्ता वाघमोडे या ग्रामपंचायत सदस्यांनी व सामाजिक कार्यकर्ते यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. सदर प्रवेशामुळे मंगळवेढा तालुक्यातील भालके गटाला जोरदार धक्का बसला आहे.

सदरप्रसंगी आमदार आवताडे यांच्या हस्ते जनसंपर्क कार्यालय मंगळवेढा येथे सर्व नवप्रवेशित पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. सोयीनुसार राजकारणातील भूमिका वेळोवेळी बदलणाऱ्या आणि कार्यकर्त्यांना कोणतीही राजकीय दिशा न देणारे भगीरथ भालके हे माजी दिवंगत आमदार स्व.भारत भालके यांच्या विचारांचा वारसा चालवण्यामध्ये असमर्थ राहिल्याने आम्ही सर्वांनी एकमुखाने हा निर्णय घेतला असल्याचे सर्व कार्यकर्त्यांनी यावेळी बोलून दाखवले. यावेळी बोलताना आमदार आवताडे म्हणाले की, देशातील सर्वात मोठा राष्ट्रीय राजकीय पक्ष असणाऱ्या भाजपा पक्षाच्या व देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरील विश्र्वास अधिक दृढ होत आहे हे प्रवेशा दरम्यान



अधोरेखित झाले आहे. सर्व समावेशक समाजकारण आणि सलोख्याचे राजकारण करत असताना मतदार संघातील मूलभूत आणि पायाभूत बाबींचा विकास करणे हेच देह डोळ्यासमोर ठेवून आपण आतापर्यंत सर्वसामान्यांच्या सेवेमध्ये माझ्या पदाचा आणि अधिकाराचा वापर केला त्यामुळेच अनेक कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीच्या विचाराला आणि नेतृत्वाला बळकटी देत आहेत. येणाऱ्या काळामध्ये सुद्धा अशा पद्धतीने अनेकांचा भाजपामध्ये प्रवेश होईल असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण, विधानसभा अध्यक्ष राजेंद्र सुरवसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, जिल्हा नियोजन समिती सदस्य प्रदीप खांडेकर, युवक नेते तानाजी काकडे, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सुदर्शन यादव, माजी उपसभापती सूर्यकांत ढोणे, जेष्ठ नेते यशवंत खताळ, युवक नेते शहाजी गायकवाड, माजी सरपंच पांडुरंग कांबळे, खताळ, उपसरपंच महादेव खताळ, ग्रामपंचायत सदस्य अंकुश कसबे, राजू सुतार समाधान खांडेकर, नाथपंथी समाजाचे लक्ष्मण इंगवले, डॉ सहदेव खताळ, परमेश्र्वर खांडेकर, पांडुरंग जानकर, हरी लवटे आदी मान्यवर जेष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# गावागावात वाढले प्रत्येक राजकिय पक्षांमध्ये गटातटाचे राजकारण

अक्कलकोट/महेश गायकवाडः गावागावात वाढलेले आणि प्रत्येक राजकिय पक्षांमध्ये जे गटातटाचे राजकारण सुरू झाले आहे ते अत्यंत घातक आहे असे मत घोळसगाव येथील रामेश्र्वर पाटील यांनी व्यक्त केले आणि अशा गटातटाच्या राजकारणाबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केले.



पुढें बोलतांना रामेश्र्वर पाटील म्हणाले की, गावागावात प्रत्येक राजकीय पक्षांमध्ये गटातटाचे राजकारण वाढलेला आहे एका पक्षामध्ये किमान दोन ते तीन गट पडलेले आहेत, या गटाचे राजकारण सध्याच्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये कुठला पक्षाला मारक खाणार कुठल्या पक्षाला तारख ठरणार हे देव जाणे जिल्हा परिषद व पंचायत समिती या गणामध्ये कुठलं गाव कुठल्या पक्षाचा लीड देईल त्या गावाला पंचायत समिती व जिल्हा परिषद तिकीट मिळेल हे ग्राह्य धरून चालावा लागणार आहे त्या दृष्टीने कार्यकर्त्यांना काम करावा लागणार आहे गटातटातील राजकारणामुळे गावातील कुठला नेता तालुक्याच्या नेत्यांना हमी देईल की आम्ही अमुक अमुक पक्षाला लीड देणार हेच गुंतागुंतीचे विषय ठरलेला आहे कारण ह्याला जबाबदार आहे गटातटामुळे ग्रामपंचायत इलेक्शन पासून प्रत्येक गावामध्ये प्रत्येक पक्षामध्ये दोन ते तीन गट पडलेले आहे हे ते प्रत्येक पक्षाला धोकादायक ठरणार आहे ह्याच्याकडे आमदार तालुक्याचे नेते विसरता कामा नये शेवटी मला हेच म्हणायचे आहे गटागटाचा हा राजकारण गावचा विकासाला पण व त्या त्या पक्षाला सुद्धा धोकादायक आहे असेही मत रामेश्र्वर पाटील यांनी व्यक्त केले सद्याचे जे गटातटाचे राजकारण सुरू झाले आहे ते अत्यंत हीन राजकारण असल्याचे सांगून त्यांनी याबाबत दुःख व्यक्त केले.

## श्रीमंत सिद्रामप्पा सोडगी यांचे प्रमोशन



अक्कलकोट/प्रतिनिधीः तालुक्यातील बासलेगावाचे सुपुत्र तथा मुंबई पोलीस दलातील श्रीमंत सिद्रामप्पा सोडगी यांचे प्रमोशन होऊन ते नुकतेच पोलीस सब इन्स्पेक्टर बनल्या असल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. मागील आठवड्यात मुलगी भाग्यश्री एम बी बी एस डॉक्टर बनल्या आहेत. आत्ता वडील श्रीमंत पोलीस सब इन्स्पेक्टर बनली असून पोलीस सेवा करताना बढती मिळणे हे एक आल्हाददायक घटना आहे.त्याचबरोबर श्रीमंत यांनी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्टेशन येथे रेल्वे पोलीस दलात दाखविलेला कर्तुत्व व अपार मेहनतने केलेल्या कामाची ही शासकीय पोहोच पावती आहे.

## दाऊद इब्राहिमचा सर्वात मोठा शत्रू अद्याप जिवंत

नवी दिल्ली : गुन्हेगारी विश्र्वातील कुख्यात गुंड राजन सदाशिव निकाळजे ऊर्फ छोटा राजन याचा करोना काळात मृत्यू झाल्याची अफवा पसरली होती. राजनचा रुग्णालयात उपचार घेत असतानाचा एक फोटोदेखील व्हायरल झाला होता. त्याचदरम्यान त्याच्या मृत्यूची अफवा पसरली होती. मात्र छोटा राजन अद्याप जिवंत असल्याची बातमी समोर आली आहे. तसेच राजनचा एक फोटोदेखील व्हायरल होत आहे. भारतीय गुप्तचर यंत्रणांनी २०१५ मध्ये राजनला इंडोनेशियन पोलिसांच्या मदतीने पकडून भारतात आणलं होतं. विमानतळावर त्याला पोलिसांच्या ताब्यात देत असताना राजनचा शेवटचा फोटो समोर आला होता.

# रानमसले शाळेच्या नूतन वास्तूचे लोकार्पण शिक्षणाचा हा वसा इतर उद्योजकांनीही पुढे न्यावा : मनिषा आव्हाळे

सोलापूर/प्रतिनिधीः लक्ष्मी हायड्रोलिक्स कंपनीने सीएसआर निधीतून रानमसले येथे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेसाठी नवी इमारत बांधून देऊन व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे यांनी मोठे कार्य केले आहे त्यांनी हाती घेतलेला हा शिक्षणाचा वसा इतर उद्योजकांनीही अंगीकारावा असे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी केले

सोलापूर येथील लक्ष्मी हायड्रोलिक्स या कंपनीने उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथील मराठी शाळेसाठी एक कोटी रुपयाचा निधी खर्च करून नवी, सुसज्ज इमारत उभारली आहे या इमारतीचा लोकार्पण सोहळा २१ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजता संपन्न झाला , त्यावेळी उदघाटक म्हणून मुख्याधिकारी आव्हाळे बोलत होत्या . अध्यक्षस्थानी जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ .एन . के . ठाकरे होते .ज्येष्ठ संपादक संजय आवटे प्रमुख अतिथी होते मंचावर लक्ष्मी हायड्रोलिक्स प्रा .लि.चे व्यवस्थापकीय संचालक शरद कृष्ण ठाकरे, शिक्षणाधिकारी कादर शेख, गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्र्वर निम्बर्गी, बीट विस्तार अधिकारी बाबुराव जमादार, प्रल्हाद काशीद, सरपंच मनोहर क्षीरसागर, मुख्याध्यापक परमेश्र्वर जमादार आदी होते .

पुढे बोलताना श्रीमती आव्हाळे म्हणाल्या की अनेक समाज सुधारकांनी शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नामुळे महाराष्ट्र आज शिक्षणाच्या क्षेत्रात व विशेषतः मुलींच्या शिक्षणाच्या क्षेत्रात देशात सर्वात पुढे आहे

.माझ्या स्वतःच्या उदाहरणावरून मी हे सांगू शकते .आजच्या काळात शिक्षणाला व्यवसायाचे स्वरूप प्राप्त होते आहे ,त्यामुळे अशा जिल्हा परिषदेच्या शाळांची गरज अधिक आहे . शरद ठाकरे यांनी शाळेची इमारत बांधून दिली आता या शाळेची गुणवत्ता वाढविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे असेही त्या म्हणाल्या.



प्रमुख पाहुणे ज्येष्ठ संपादक संजय आवटे म्हणाले की जगातील सर्व महापुरुषांनी शाळा चालविल्या आहेत .कारण जग बदलण्यास सर्वात महत्त्वाची गोष्ट शिक्षण आहे हे त्यांना ठाऊक होते . आजच्या काळात गरिबांनी शिकूच नये अशा प्रकारची प्रवृत्ती पुढे येत आहे . त्यामुळे सार्वजनिक व्यवस्था संपवल्या जात आहेत . अशा काळात सार्वजनिक शाळा खूप महत्त्वाच्या आहेत . माजी कुलगुरु ठाकरे यांनी धुळे जिल्ह्यात मोराणे या ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणसाठी शाळा सुरू केली . त्यांचे बंधू शरद ठाकरे यांनी उत्तर सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेसाठी नवीन वास्तू बांधून दिली ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहेत .अशा शाळा वाढाव्यात आणि त्यातून विद्यार्थ्यांना माणुसकीचे शिक्षण देण्यात यावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली .

अध्यक्षीय भाषणात प्रा . ठाकरे म्हणाले की जो शेतकरी देशासाठी संपत्ती निर्माण करतो, तोच आज हालाकीत जगतो आहे . शेतकऱ्यांचा देशामध्ये कोणी वाली नाही .खेडी अजूनही बदलत नाहीत . खरा बदल शिक्षणामुळेच घडू शकतो, त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळा महत्त्वाच्या आहेत .माझ्या लहान बंधूंनी जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी इमारत बांधून दिली याचा मला अभिमान वाटतो . यापुढेही त्यांनी ग्रामीण भागातील शाळांसाठी अधिक निधी उपलब्ध करून द्यावा असे आवाहन त्यांनी केले .

प्रारंभी लक्ष्मी हायड्रोलिक्स प्रा लि . चे व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे यांनी प्रास्ताविकात सांगितले की २५ वर्षांपूर्वी आम्ही सोलापूर परिसरात लक्ष्मी हायड्रोलिक्सची सुरुवात केली आता १००० कामगार आमच्याकडे काम करतात ,कंपनीची उलाढाल ही मोठ्या प्रमाणात वाढली आहे कंपनीतर्फे अनेक सामाजिक उपक्रम सातत्याने हाती घेतले जातात, मात्र या शाळेसाठी बांधून दिलेल्या इमारतीमुळे आम्हालाही समाधान वाटले, या शाळेला यापुढच्या काळात आय .एस .ओ मानांकन मिळावे म्हणून आम्ही प्रयत्न करू .शाळेतील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेच्या माध्यमातून पुढे जावे असे आवाहन त्यांनी केले

कार्यक्रमाचे प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले मान्यवरांच्या हस्ते इमारतीच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले, या इमारतीला स्व शेवंता कृष्णा ठाकरे यांचे नाव देण्यात आलेले आहे या इमारतीचे आर्किटेक्ट मोटे यांच्यासह मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती शिवाजी धुमाळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आकाश यांनी आभार प्रदर्शन केले या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते

# बापगाव, साईराम नगर मध्ये संयुक्त जयंती साजरी



भिवंडी/मिलिंद जाधव :महामानवांचा विचारांचा रथ पुढे नेण्यासाठी, वारसा जपण्यासाठी, त्यांच्या महान कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी, भिवंडी तालुक्यातील बापगाव, साईराम नगर येथील साईराम मित्र मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, वंदन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी साईराम नगर ते जय मल्हार पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. महिलांसाठी संगीत खुर्ची घेण्यात आली तर महापुरुषांच्या विचारधारेवर प्रश्र्नमंजुषा घेण्यात आली. तर मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.त्यात या श्रेया ठोके या मुलीने सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तर उद्योगपती संदीप म्हात्रे, गणेश मेहर यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. तर कवी, पत्रकार मिलिंद जाधव कविता सादर केली.यावेळी प्रमुख म्हणून बापगावं ग्रामपंचायतिचे सदस्य किशोर गायकवाड , अविनाश जाधव तसेच संतोष जाधव, राजेंद्र गायकवाड,कल्याण विभाग अध्यक्ष किरण गायकवाड, पत्रकार राजू काऊतकर, पत्रकार मिलिंद जाधव, दामोदर साळवे, संजय जाधव, पाटील, सुनील जमदारे, अँड विश्र्वनाथ तायडे, पूजा वाघ, नामदेव तायडे, तर आदि उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष प्रताप बोदडे, सचिव कुलदीप काऊतकर, सचिन वाकोडे ,आकाश वाकोडे ,विशाल बोदडे, गणेश गायकवाड , शांताराम जाधव, सुरज काऊतकर, विशाल बोदडे, संदेश गायकवाड , दिनेश काशिंदे , हेमंत जाधव, इंगोळे,सचिन वाकोडे, धिरज भालेराव ,विशाल पुंडगे,अमोल महाले, उद्धव काशिंदे, महिला मंडळाच्या अध्यक्षा मिराताई काऊतकर, प्रमिला बोदडे, अंजली काशीद,चांदणी जाधव, अलका काऊतकर, सोनी बोदडे यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे सूत्रंचालन प्रताप बोदडे यांनी केले.

# स्वेरी फार्मसीच्या प्रा.डी.जे. यादव यांना पीएच.डी.प्राप्त

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी मधील प्रा.दत्तात्रय जालिंदर यादव यांना नुकतीच अहमदाबाद (गुजरात) मधील निरमा विद्यापीठाकडून फार्मसीमध्ये पीएच.डी. ही पदवी प्रदान करण्यात आली. 'सोल्यूब्लीटी अँड बायोअॅव्हेलॅब्लीटी इनहान्समेंट ऑफ पुअर्ली वॉटर सोल्युबल एपीआय फॉर कॉस्ट इफेक्टिव फॉर्म्युलेशन' या विषयावर त्यांनी आपला शोधप्रबंध निरमा या विद्यापीठास सादर केला होता.

डॉ. जिग्नाशा सावजानी यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली आणि स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांच्या सहकार्याने त्यांनी फार्मसीमधील पीएच.डी. पूर्ण केली असून त्यांना महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांचेही सहकार्य लाभले. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे हे प्राध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी नेहमीच प्रोत्साहन देत असतात.

डॉ.डी.जे यादव यांनी पीएच.डी.च्या संशोधनात एचआयव्हीच्या औषध उपचारासाठी लागणाऱ्या अँटी



व्हायरल औषधाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी विविध प्रयोग केले. डॉ. डी.जे यादव यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये आजपर्यंत एकूण सात संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत तसेच नामांकित प्रकाशनाच्या पुस्तकामध्ये दोन बुक चॅप्टर्स देखील त्यांनी प्रसिद्ध केले आहेत. या संशोधना दरम्यान त्यांनी अहमदाबाद येथील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधनपर पेपर्सचे सादरीकरण केले आहे. डॉ. डी.जे यादव हे स्वेरीच्या फार्मसी महाविद्यालयात गेल्या ८ वर्षापासून उत्कृष्टपणे ज्ञानदान करत आहेत. यापूर्वी त्यांनी बी. फार्मसी शिक्षण स्वेरी मधून पूर्ण केले. पीएच.डी. प्राप्त केल्याबद्धल स्वेरीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त मुंबईमधील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथील प्रा. डॉ.भास्कर थोरात यांच्या हस्ते डॉ.यादव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सौ.पद्मा थोरात, भानुदास वाघमारे, सौ. जमुना वाघमारे, पालक, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, स्वेरीचे विश्र्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्र्वस्त प्रा.सुरज रोंगे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पीएच.डी. प्राप्त केल्याबद्धल स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे यांच्यासह अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी डॉ. डी.जे. यादव यांचे अभिनंदन केले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.